# विकसित महाराष्ट्र - २०४७

महाराष्ट्र शासनाचा २०२६-२०२७ या वर्षाचा
अर्थसंकल्प विधानसभेला सादर करताना

## श्री. देवेंद्र फडणवीस
### मुख्यमंत्री

यांनी शुक्रवार, दिनांक ६ मार्च २०२६ रोजी
केलेले भाषण

भाग - दुसरा

*

माननीय अध्यक्ष महोदय,

मी, आता अर्थसंकल्पाचा भाग-दोन माननीय सभागृहासमोर सादर करीत आहे.

१. सन २०२५-२६ या आर्थिक वर्षासाठी राज्याचा स्वत:च्या कर महसूलाचा सुधारीत अंदाज रुपये चार लाख नऊ हजार पाचशे त्र्याण्णव कोटी आहे.

२. सन २०२६-२७ या आर्थिक वर्षात स्वत:च्या कर महसूलाचे अर्थसंकल्पीय उद्दिष्ट रुपये चार लाख पंधरा हजार सहाशे त्रेपन्न कोटी एवढे निश्चित करण्यात आले आहे.

**गृह विभाग (परिवहन)**

**जुन्या वाहनांचे निष्कासन करुन नवीन वाहन खरेदी करतेवेळेस वाहन खरेदीदारास मोटार वाहन करामध्ये अधिक सूट देणे.**

१. बीएस-४ व त्यावरील प्रदुषणाची मानके असलेले वाहन निष्कासित करुन नवीन वाहन खरेदी करताना मोटार वाहन करामध्ये १६ टक्के व बीएस-३ व त्याखालील प्रदुषणाची मानके असलेले वाहन निष्कासित करुन नवीन वाहन खरेदी करताना मोटर वाहन करामध्ये ३० टक्के सूट देण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

**जुन्या परिवहनेतर (खाजगी) वाहनांच्या पर्यावरण करामध्ये वाढ करणे.**

२. बीएस-४ व त्याखालील वायू प्रदूषणाची मानके असलेल्या परिवहनेतर (खाजगी) संवर्गातील वाहनांच्या पर्यावरण करामध्ये दुचाकी वाहनावर रुपये दोन हजारावरुन रुपये चार हजार, हलके मोटार वाहन (पेट्रोल) कार यावर रुपये तीन हजारावरुन रुपये सहा हजार व हलके मोटार वाहन (डिझेल) कार यावर रुपये साडेतीन हजारावरुन रुपये सात हजार वाढ करण्याचे प्रस्तावित करीत आहे.

क्रेन आरोहित वाहनांची कराची कमाल मर्यादा रुपये ३० लक्ष करणे.

३. सद्या राज्यात क्रेन आरोहित वाहने (Crane Mounted Vehicle) यांना वाहन किंमतीच्या ७ टक्के प्रमाणे एक रकमी कर आकारण्यात येत आहे. अशा वाहनांना मोटार वाहन कराची कमाल मर्यादा म्हणजेच रुपये तीस लक्ष करण्याचे प्रस्तावित आहे.

## मुद्रांक शुल्क

महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ५९, ६०, ६३ A व ६८ A मध्ये कमी मुद्रांकावर दस्त निष्पादित केल्यास होणाऱ्या दंडात्मक तरतुदींची फेररचना.

४. महाराष्ट्र मुद्रांक अधिनियम कलम ५९, ६०, ६३ A व ६८ A या कलमांमध्ये कमी मुद्रांकावर दस्त निष्पादित केल्यास अपराधसिद्धीनंतर सक्त मजुरी व शास्तीची तरतूद आहे. सदर शास्तीच्या रकमेत फेररचना करुन रुपये पाच हजारावरुन एक लाख रुपयांपर्यंत वाढ करणे प्रस्तावित आहे.

यामुळे कमी मुद्रांकावर दस्त निष्पादन करण्याचे प्रमाण नियंत्रणात येईल.

प्रगतीशील, शाश्वत, सर्वसमावेशक, सुशासन या चार सूत्रांना घेऊन हा अर्थसंकल्प मी सादर केला. त्याच सूत्रावर चार ओळी सादर करुन अर्थसंकल्पीय भाषणाचा मी शेवट करतो...

युग नवे प्रगतीचे,
शाश्वत अन् दमदार विकासाचे,
सुशासन अन् सर्वसमावेशकतेचे,
नाविन्यतेचे अन् पारदर्शी प्रामाणिकतेचे,
सूत्र हेच विकसित महाराष्ट्राचे !

**वरील प्रस्तावांना सन्माननीय सदस्यांचा पाठिंबा मिळेल, असा माझा विश्वास आहे.**

**जय हिंद ! जय महाराष्ट्र !!**

*******